सातारा सैनिकी स्कूल येथील विद्यार्थ्यांच्या
भोजन भत्यात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सासैशा-२०१९/प्र.क्र.६०/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ३२
तारीख: १३ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय क्रमांक: सासैशा-१०९२/(४३१/९२)/माशि-८, दि.२ ऑगस्ट १९९५.
२) शासन निर्णय क्रमांक: सासैशा-१०९८/(१३४/९८)/माशि-७, दि.२ फेब्रुवारी २००१.
३) शासन निर्णय क्रमांक सासैशा-२०१२/(८८/१२)/माशि-७, दि. ५ जुलै २०१३.
४) सैनिक स्कूल सातारा यांचे क्र.२३१/S/A/१०७३, दि.१६ फेब्रुवारी २०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

सातारा सैनिकी शाळेची स्थापना दि.२३ जून १९६१ रोजी झाली असून सदर शाळा ही देशातील पहिली सैनिकी शाळा आहे. महाराष्ट्रातील तळागाळातील व सर्वस्तरावरील गरीब व होतकरु मुलांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून भारतातून सैन्य दलात अधिकारी पदावर संधी मिळावी हा या शाळेचा मुख्य उद्देश आहे. या शाळेतून मोठया प्रमाणावर विद्यार्थी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये आतापर्यंत भरती झाले आहेत. सदर शाळेतील विद्यार्थ्यांना,शासन निर्णय,दिनांक ५ जुलै,२०१३ अन्वये प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.७२/-या दराने भोजनभत्ता मंजूर करण्यात आला आहे. सातारा सैनिकी शाळेबाबत केंद्र शासन व राज्य शासनामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सातारा सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांना भोजन भत्ता प्रदान करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. भोजन भत्त्याचा दर निश्चित झाल्यापासून अन्नधान्याच्या किंमतीत झालेली वाढ तसेच एकूण महागाईत झालेली वाढ या अनुषंगाने सातारा सैनिक स्कूल येथील विद्यार्थ्यांच्या आहारभत्याचा दर प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.७२/-वरुन रु.७९/-(रुपये एकोणऐंशी फक्त) इतका करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

सातारा सैनिक स्कूल येथील विद्यार्थ्यांना प्रतीदिन प्रती विद्यार्थी रु.७९/-प्रमाणे भोजनभत्ता मंजूर करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे. भोजन भत्यांचे सुधारीत दर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू राहतील. तसेच सदर भोजन भत्याचे दर चंद्रपूर सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना देखील लागू राहतील.

२. सदर खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षा खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २८५/व्यय-५, दि. ०३.०५.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१३१६३५२०५७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUSHIL KHODWEKAR

Digitally signed by SUSHIL KHODWEKAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=1c4a8f0aafeac0a009d462f7f02d23942001d76225b9f704de26731171c8684b, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=19b0ccbee5810aa5e36e9fa467a7630471d3c500ceb353fbb37bf0b6dfe0407a, ou=SCHOOL EDUCATION AND SPORT DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUSHIL KHODWEKAR
Date: 2019.08.13 16:46:13 +05'30'

(सुशील खोडवेकर) (भा.प्र.से.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
२. अप्पर मुख्य सचिव, (शालेय शिक्षण)मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
५. प्रधान महालेखापाल(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
८. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा.
९. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
११.जिल्हा कोषागार अधिकारी,चंद्रूपर.
१२.वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
१३.प्राचार्य, सैनिकी स्कूल, सातारा.
१४.प्राचार्य, सैनिकी स्कूल, चंद्रपूर.
१५.सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१६.मानद सचिव, बोर्ड ऑफ गव्हर्नस सैनिकी स्कूल, नवी दिल्ली.
१७.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. वित्त विभाग,व्यय-५, मंत्रालय,मुंबई-३२
१९.निवड नस्ती (एसएम-६)